जा.क्र./नांवाशमनपा/बिएसयुपी/१०५२/२०११
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड
दि. ११ /०१ /२०१२

मनपा लोगो

# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड

**अशासकीय संस्था (एन.जी.ओ.) पॅनल निवडीबाबत**

केंद्र शासनाच्या राजीव आवास योजनेची प्रभावी अंमलबजावणी नांदेड शहरात नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड मार्फत सुरू होणार असून या लोकसहभागावर आधारित कार्यक्रमासाठी अशासकीय संस्था एन.जी.ओ.पॅनलसाठी विविध अशासकीय संस्था (एन.जी.ओ.) मार्फत प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. राजीव आवास योजना ही नांदेड शहरातील झ ाोपडपट्टीभागात राबविण्यात येणार असल्याने ज्या संस्थांनी केंद्र व राज्य शासनाच्या लोकसहभागावर आधारित कार्यक्रमात सहभाग नोंदविला व ज्या अशासकीय संस्थांनी झोपडपट्टीभागासाठी यापुर्वी काम केले आहे अशांना प्राधान्य देण्यात येणार असून झोपडपट्टीभागांचे सर्व्हेक्षण, समुह संघटन, लोकसहभाग ई.सारख्या कामांबरोबरच लोकसहभागाशी संबंधित सर्व कामे अशासकीय संस्थेमार्फत (एनजीओ) होणे अपेक्षित आहे. प्रस्तावाबाबतची सविस्तर माहिती नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या www.nwmcnanded.org वेबसाईटवर दि.१६/०१/२०१२ पर्यंत उपलब्ध करण्यात येणार असून विहित वेळेत संस्थांनी आपले प्रस्ताव दाखल करावेत.

आयुक्त, स्वा/-
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड

## *अशासकीय संस्था (एन.जी.ओ.) पॅनलसाठी पात्रता व निकष*

१ पॅनलसाठी अर्ज करणारी संस्था (एन.जी.ओ.) ही नोंदणीकृत संस्था असणे आवश्यक आहे. मागील पाच वर्षाचे ऑडीट असल्यास प्राधान्य.

२ संस्थेकडे विविध पदांवर कार्यरत कर्मचारी वर्ग सध्या अस्थित्वात असणे आवश्यक आहे व संस्थेने उमेदवारांच्या नाव व हुद्यासह त्याचा तपशिल सोबत जोडावा.

३ शहरी व ग्रामीण भागात विशेषः शासकीय कार्यक्रमांमध्ये संस्थेने काम केलेले असावे झोपडपट्टीभागात काम करणाऱ्या संस्थेला यात प्राधान्य देण्यात येईल.

४ संस्थेने नोंदणीपासून आतापर्यंत आपले लेखा विषयक व इतर कागदपत्रे अदययावत ठेवलेली असणे आवश्यक आहे.

५ संस्थेने **दि.२३/०१/२०१२** पर्यंत आवश्यक कागदपत्रांसह अर्ज करणे आवश्यक आहे.

६ संस्थेविरूध्द कोणतीही फौजदारी कारवाई असू नये.

७ शासनाकडून व महानगरपालिकेकडून वेळोवेळी सांगण्यात आलेली कामे करणे संस्थेस बंधनकारक राहिल.

८ पात्र संस्थेसोबत रितसर करार केला जाईल.

९ शहराचे सर्वेक्षण ,स्लम प्रोफाईल याबरोबरच लोकांचा सहभाग योजनेत वाढविण्यासाठी आवश्यक ती सर्व कार्ये, प्रशिक्षण, संघटन, प्रबोधन यासारखी कामे संस्थेकडून (एन.जी.ओ.)अपेक्षित आहेत.

१० संस्थेला आजवर केलेल्या कामांचे पी.पी.टी. (पॉवर पॉईन्ट प्रेझेंटेशन) सादरीकरण करावे लागेल.

११ स्थानिक संस्थांना यात प्राधान्य देण्यात येईल.